| | | | |
|---|---|---|---|
| <?xml version="1.0" ?> | | | |
| <?xml-stylesheet type="text/css" href="home.css"?> | | | |
| <Doc id="mar-w-media- | MA00001 | " | lang="Marathi"> |
| <Header type="text"> | | | |
| <encodingDesc> | | | |
| <projectDesc> | CIIL-Multilingual parallel text corpora | | </projectDesc> |
| <samplingDesc> | Simple written text only has been transcribed. Diagrams, pictures, tables and verses have been omitted. Samples taken from page 5, 10, 15, 20, 25, 30, 35, 40, 45, 50 | | </samplingDesc> |
| </encodingDesc> | | | |
| <sourceDesc><br><biblStruct><br><source> | | | |
| | <category> | Aesthetics | </category> |
| | <subcategory> | Literature-Novels | </subcategory> |
| | <text> | Book | </text> |
| | <title> | mAtIcA mANUsa | </title> |
| | <vol> | | </vol> |
| | <issue> | | </issue> |
| </source> | | | |
| <textDes> | | | |
| | <type> | | </type> |
| | <headline> | | </headline> |
| | <author> | kAlIMdIcaraNa pANIgraha | </author> |
| | <translator> | vhI. kE. dhOragaDE | </translator> |
| | <words> | 3199 | </words> |
| </textDes> | | | |
| <imprint> | | | |
| | <pubPlace> | India-New Delhi | </pubPlace> |
| | <publisher> | sAhitya akAdamI | </publisher> |
| | <pubDate> | 2001 | </pubDate> |
| </imprint> | | | |
| <idno type="CIIL code"> | | 8706 | </idno> |
| <index> | | MA00001 | </index> |
| </biblStruct><br></sourceDesc> | | | |
| <profileDesc><br><creation> | | | |
| | <date> | 19-Aug-2009 | </date> |
| | <inputter> | H.S.Rupa | </inputter> |
| | <proof> | Supriya Shetty | </proof> |
| </creation> | | | |
| <langUsage> | | Marathi | </langUsage> |
| <wsdUsage> | | | |
| <writingSystem id="ISO/IEC 10646">Universal Multiple-Octet Coded Character Set (UCS).<br></writingSystem> | | | |
| </wsdUsage> | | | |
| <textClass> | | | |
| <channel mode="w"> | | print | </channel> |
| <domain type="public"> | | | </domain> |
| </textClass> | | | |

| | | |
|---|---|---|
| </profileDesc><br></Header> | | |
| <text><body> | | |
| <p> | तिची सरबत्ती सुरू होई - “तुम्ही अशाच. तुम्ही तरी काय करणार? पडला तुमचा रड! तुम्हाला राण्या बनवून आयतं गिळायला आणलं का या घरात?” | </p> |
| <p> | दोघींतून धाकल्या सुनेवर म्हातारीची जरा मेहेरनजर असे. ती धाकटी होती हेच कारण. जे लहान आहेत, ज्यांना बळ नाही त्यांना जग जरा माया दाखविते. त्यामुळे धाकटीचे अंग धुणे, लेणे नेसणे, वेणीफणी, जेवणखाण ठीक होते की नाही इकडे म्हातारी सतत नजर ठेवायची. थोरल्या सुनेच्या ते डोळ्यात येई. तिला वाटे, आपल्या पोटी चार चार मुले आहेत. आपले कौतुक व्हावे. चार मुलांचे मातृत्व! त्यामुळे तिला अस्मान ठेंगणे वाटत असे. तिची अपेक्षा अशी की, सासूने, सासऱ्याने, पतीने आपले कोडकौतुक करावे, पुरवावे. म्हातारी धाकटीला हाक मारून जेव्हा म्हणे. “अगं, जरा इकडे येशील. किती गुंता झाला आहे तुझ्या केसांचा. केस सुटून नुसते उडताहेत भुरूभुरू. तीन दिवसांपासून माझा हात काही लागला नाही. आण तेलाची वाटी.” तेव्हा थोरली सून उचकणे देऊन बोलायची “हो, अजून कुकुलं बाळच तर आहे, स्वतः इतकं लक्ष घालायला!” | </p> |
| <p> | त्यावर म्हातारी उत्तर देई - “का गं ए खंडायताच्या पोरी! तुझं जसं मी काही केलंच नसेल ना? आपल्या मनाला विचार की जरा!” | </p> |
| <p> | “मी पडल्ये गरिबाची मुलगी. काही करायची गरज आहे कुणाला?” थोरली तणतणत आपले काम करू लागे. | </p> |
| <p> | “अगबाई! पहा तर कशी दुस्वास करते ती! तरी बरं, ती बिचारी घरी आली तेव्हापासून धाकटी म्हणूनही मी कधी आजवर तिची विचारपूस केली नाही. केसांचा बुचडा झाला म्हणून जरा हात लावायचीही उजागरी नाही की काय मला? तू तर वाभाडेच काढायला धावतेस नुसती!” | </p> |
| <p> | गारूड्याचा शेपटीवर हात पडताच जसा साप फणा उगारत तशी थोरली फुत्कारू लागे. - “म्हणे धाकटी. सदा पहावं तर ती आपली धाकटीच! माझ्या हारा आणि सोनापेक्षाहि लहान असेल ती नाही का? कळतात मला या गोष्टी. मी कांही बोंडल्यानं दूध पीत नाही म्हटलं. माझी मुलं भूकभूक करतात तेव्हा मात्र कधी त्यांना घासभर भात उकडून घालणं होत नाही कुणाच्यानं; येवढंसं तोंडीलावणंहि पुढे करीत नाही त्यांच्या कोणी? मीच मात्र सगळ्यांचं केलं पाहिजे. अडलंय माझं मी काही करावं म्हणून!” | </p> |
| <p> | “अगे, धाकटी जाऊ ना तुझी ती? तिच्याशी का भांडतेस अशी? तू लावशील तेच वळण तिला लागेल ना?” | </p> |
| <p> | “अहाहा! वाटच पाहाताहेत सगळे माझ्या शिकवण्याची. तुम्हीच सांगा काय सांगायचं ते. आणि मी विचारते तुमचं तरी किती ऐकलं आहे तिनं?” | </p> |
| <p> | सासू चिडून जात असे. “तुला शिकवून झालं. तीच राहिली तेवढी आता. मला काय, करा जे काय मनास येईल ते. मी आपली वेगळीच बरी. भाजीचा मळा माझा बागेत आहे, शेवग्याचं झाडही आहे. माझ्यासाठीच हे सगळं मी करते असंच ना?” | </p> |
| <p> | जेवण होताच छकडी आपल्या झोपायच्या खोलीत गेला. टिचभर खोली ती. त्यातूनही अर्ध्या | </p> |

| | | |
|---|---|---|
| | जागेत कुळीथाचे मोठमोठे रांजण ठेवलेले! निजायला खाट नाही; भुईवर चटई अंथरून वर वाकळ टाकली की झाला बिछाना. भिंतीतील लहानशा कोनाड्यात एरंडीची तेलवात आहे; तिच्याखाली तेलाचे किटण बसले आहे. धूकटून काळ्या झालेल्या आढ्याला धानाचे दोन हारे लटकत आहेत. आजूबजूला धानांतले किडे मिरवत आहेत. जवळच दोन शिंकी टांगलेली असून त्यावर परळाने झाकलेल्या घागरी ठेवल्या आहेत, एकीत आमसूल व आंब्याच्या खुला आणि दुसरीत जून होऊन जाळी धरलेली मोहरी आहे. खाली एक बेलाची पेटी आहे. कोनाड्याशी एक आंब्याचा पेटारा आहे. पानाला चुना लावून खोक्याला बोटे पुसल्यामुळे पेटाऱ्याला जागोजागी पांढरे पट्टे ओढलेले आहेत. | |
| <p> | भिंतिच्या कोपऱ्यात कोळ्याने जाळे ताणून दिले आहे; वर एकदोन वटवाघळे बाहेरून आत आणि आतून बाहेर फडफड करीत किडे टिपत घिरट्या घालीत आहेत; रांजणाच्या खाली कर्रकर्र आवाज करीत उंदीर जमीन उरकत आहेत. एकूण सारे घर जणू सामान ठेवण्यासाठी व जनावरांसाठीच असून त्यांनी मोठ्या मेहेरबानीने त्यातली चार हात जागा माणसांना मोकळी करून दिली होती! म्हाताऱ्याची व बरजूची झोपण्याची जागा तर छकडीच्या जागेपेक्षाही वाईट होती. छकडीच्या खोलीत राधाकृष्णाच्या एकदोन तसबिरी टांगलेल्या दिसतील; पण त्या दोघांच्या खोलीच्या कोपऱ्यात नुसती उंदरांनी उकरलेली माती व वटवाघळांची शीट, यांचा ढीग! सकाळी उठल्याबरोबर पहिले काम ते सगळे फेकून जागा झाडण्याचे असे. | </p> |
| <p> | बिचाऱ्या छकडीच्या भाग्याने कसे घर मिळाले आहे पहा! जमाखर्च सर्व आहे बापाच्या आणि मोठ्या भावाच्या हाती! छकडीला कोण विचारतो? एक चांगलासा कंदील किंवा एखादी पेटी आणतो म्हटले तरी उजागरी नाही. म्हातारा त्याचे सर्व बेत धुळीला मिळवतो. दुसरीकडे जाऊन दुसऱ्याची गुलामी करणे त्याला पटत नाही. | </p> |
| <p> | भाऊदेखील कधी त्याची बाजू घेत नसे. त्यामुळे छकडी मनातल्या मनात बापावर व भावावर जळत असे. | </p> |
| <p> | घरातले कामकाज आटोपून कड्यातोड्याची छुमछुम करीत छकडीची बायको नेत्रमणी खोलीत आली. तिने छकडीकडे पाहिलेही नाही मगा बोलणे दूरच. साडीचा पदर पसरून दरवाज्याजवळ ती झोपून राहिली. त्यावरून घरात आज धूसफूस झाली हे छकडीने ताडले. | </p> |
| <p> | हसून त्याने विचारले. “का? आज काय झालं?” गृहिणीने उत्तर दिले नाही. छकडीने तिचा हात धरून तिची समजूत घालायचा प्रयत्न केला. पत्नीने त्याचा हात झिडकारून म्हटले - “माझ्यासमोर नको हे अनुनयाचं नाटक! ते दाखवायला आहेत तुमचे भाऊ, भावजय, पुतणे, पुतण्या! ढोंगी कुठले!” | </p> |
| <p> | हे खरे होते. बरजूने आठवून पाहिले तेव्हा त्याला खरेच याचे प्रत्यंतर मिळाले नोकरी केली म्हणजे माणुसकी हळूहळू नाहीशी होत जाते. चंद्राला राहू ग्रासून टाकतो तसाच माणसाच्या हृदयातील असुर माणुसकीचा घास करतो. गरीब, आपला घाम गाळून पोट भरणारी माणसे दुनियेत काहीच करीत नाहीत असे नाही. जगाची सर्वात मोठी गरज आहे अन्न आणि वस्त्र! ही गरज कोण जगविते? गरीबच ना? माणूस हवेवाचून जगू शकत नाही पण आपल्याला हवा जागविते हेच तो सतत सरावाने विसरतो. तसेच जग देखील गरिबांचे शोषण करून जगते पण त्याची जाणीव मात्र कोणीच बाळगीत नाही. | </p> |

| | | |
|---|---|---|
| <p> | बरजूने निश्चय केला की पुरे झाले हे! आपण नोकरी सोडून द्यायची! त्याचा पीढीजात धंदा माती खणण्याचा! वाडवडिलांचा धंदा केला तर त्यात लाज कसली? | </p> |
| <p> | महाताऱ्या पधानाचे भाकीत खरे ठरले. म्हातारी मरून वर्ष होते न होते तोच त्याला यमाचे बोलावणे आले. त्याने देवाघरची चिठ्ठी वाचली. तो हसला - "संपला रे बाबांनो आमचा कारभार! आता तुम्ही जाणे आणि तुमचं काम जाणे! एक गोष्ट तेवढी सांगून जातो. शेतात धुरा पडता कामा नये; अंगणात भिंत उभी राहता कामा नये. एकीच्या दोन चुली करू नका." | </p> |
| <p> | मोठ्या सुनेने मुलांना पढवून पाठवले. ती आजोबांकडे जाऊन विचारू लागली - "आजोबा, आजोबा, आमच्यासाठी कुठं काय आहे तेवढं सांगून द्या." म्हाताऱ्याने एकदा डोळे उघडले, पुन्हा मिटले, पुन्हा उघडले. डोळे उघडून तो टकाटका पाहू लागला! जणू काही तो काहीतरी, कोणाला तरी शोधत होता. पुन्हा त्याच्या पापण्या मिटल्या. मोठी नात हारा ओरडून विचारू लागली, "आजोबा, आमच्यासाठी काय ठेवलं आहे?" म्हाताऱ्याने पुन्हा डोळे उघडले. टकाटका पहिले. जणू ते बोल कुठून तरी फार अंतराहून येत होते. छकडी जवळच म्हाताऱ्याचे कपाळ चेपीत होता. म्हाताऱ्याला हाराचा प्रश्न त्याने समजावून सांगितला. जगातली रीत अशी की, अंतःकाळी पुत्रपौत्रांना देण्यासाठी म्हातारे पैसे जमवून ठेवतात. म्हाताऱ्याने काय ठेवले आपल्या दोन मुलांसाठी? आपल्या सुनांसाठी? आपल्या नातवंडांसाठी? म्हाताऱ्याने डोळे उघडले. तो हसला. वर बोट दाखवीत तो येवढेच म्हणाला - "धर्म, धर्म ठेवून जातो मी!" | </p> |
| <p> | डोळ्यांची उघडझाप थांबली. ते मिटले. पुन्हा उघडले नाहीत…! | </p> |
| <p> | सर्व हाहाःकार माजला. मुलं, सुना, नातवंडे आक्रोश करू लागली. बरजू पित्याच्या शवापासून बाजूला झाला तेव्हा त्याच्या डोळ्यांत चारदोन अश्रु साचले होते. त्याने ते उपरण्याने टिपले व तो मर्तिकाच्या तयारीला लागला. त्याने कुटुंबातल्या माणसाची समजूत घातली. "कशाला रडता? काय होणार रडून? जगणे-मरणे हा तर दुनियेचा नित्यक्रम आहे." | </p> |
| <p> | जदू दलेई नात्याने भाऊ लागतो बरजूचा; शेजारच्या शेतात तो गुडघे सावरून उठतो. दोघांत मधून मधून गप्पा सुरू आहेत. इतर शेतकरीही मधून मधून घरादाराच्या, शेतीवाडीच्या गोष्टी करीत आहेत. | </p> |
| <p> | "बरजूदादा, सगळा नशिबाचा खेळ आहे बरं! सालगुदस्त चारदोन बिघे ऊस चांगला पिकला होता. पण यंदा सगळी झाडं कशी सुकटून गेली आहेत. पेरणीचा खर्च तरी निघतो की नाही देवजाणे!" | </p> |
| <p> | "ही आपल्या स्वाधीनची गोष्ट आहे का? होतील तेवढे कष्ट करू; कष्टावाचून आपल्या हाती आहे तरी काय?" | </p> |
| <p> | "खरं आहे बाबा, या गोष्टी आपल्या हातच्या नव्हेत! कर्ताधर्ता कोणी असेल तर ते कर्म! गुरू-द्गुरू सगळे प्राक्तनच! प्राक्तनात नसेल तर देईल कोण? मुलाला आजार झाला, देवीदेवता, नवस सायास, मंगलामातेची उपासना सारं सारं केलं पण प्राक्तनात नव्हतं म्हणून सर्व यत्न फुकट केले. सगळं व्यर्थ आहे. सार्थ असेल ते केवळ कर्म! तो मुलगा जिवंत असता तर आज काळजी मिटली असती! सहा महिने कलकत्त्याला जाऊन असता तर जगू सुईचे धान घेतले होते ते कर्ज फिटलं नसतं का? मिश्रजीचे रुपये फिटले नसते?" | </p> |
| <p> | "माणूस जे ठरवितो तेच झालं असतं तर…" | </p> |

| | | |
|---|---|---|
| <p> | “हो दादा!” असंच आहे. माणसाची इच्छा म्हणजे काहीच नव्हे. नशीबच खरं! हे नशीबच सोन्याची माती अन मातीचं सोनं बनवीत असतं.” | </p> |
| <p> | बरजू हसला - “आपल्या डोळ्यांसमोरचं उदाहरण घ्याना! ते पहा हरी मिश्राचं घर. त्याचं कर्म किती चांगलं आहे, नाही?” | </p> |
| <p> | “होय ना. संसारात धर्म आहे हे मग म्हणायचं कशाला? धर्म फक्त गीता, रामायणात आहे. हरी मिश्रासारखा ब्राह्मण दुसऱ्याची घरं उजाडतो, दुसऱ्यांच्या नरडीवर नख देतो तरीदेखील त्यानं त्या दिवशी बंदोबस्ताच्या अधिकाऱ्यासमोर गंगाजल व तुळशीपत्र उचललं, शपथ घेतली आणि सगळी जमीन पंचांसमोर घशात घातली आपल्या. आग पचवून चालणारा माणूस आहे तो! पाहाताच आहा ना तुम्ही. त्याला धनार्जनाची कसलीच वाण नाही. हे पाहिलं की, दुनियेत धर्म आहे असं कोण म्हणेल?” | </p> |
| <p> | “ती ऐकत नसेल तर दोष तिचा नाही, तुझाच आहे. कारण, तुझ्याकडे वडीलपणा आहे. दोघीचं सूत बिनसलं तेही तुझ्यामुळे. कारण तू वडील आहेस. तुला अधिक कळतं, तिच्याहून तुझ्यात अधिक समज आहे.” | </p> |
| <p> | “भावा-भावजयीकडूनच बोलणार तुम्ही, माझी बाजू थोडीच घेणार! ” हाराच्या आईच्या डोळ्यांत पाणी आले - “मी कोण आहे तुमची! मी परकी ना? अगदी सात पिढ्याची परकी.” | </p> |
| <p> | बरजूने तिला समजविण्याचा खूप प्रयत्न केला. तऱ्हेतऱ्हेची उदाहरणे दिली; पुराणांचे, इतिहासाचे योग्य दाखले दिले, पण सगळे व्यर्थ! तिला त्याचे कार्य! उमज पडेल तर शपथ! | </p> |
| <p> | आपल्या संसारात आणि स्वतःमध्ये छकडी चांगलाच रममाण झाला आहे. आता आपण स्वतः आणि आपली गृहिणी यापलीकडे त्याचे जग राहिले नाही. भाऊ, भावजय, त्यांची मुले सगळी जणू त्याच्या लेखी दूर नघून गेली आहेत. त्याचा भाऊ! भावासमोर कधी नीट वर पाहाण्याची त्याची प्रज्ञा नव्हती; ज्या भावानं त्याला कधी ‘जा रे शेतात आणि कर कष्ट’ असे म्हटले नाही, तोही त्याच्या जमे परका झाला आहे. यात्रेत किंवा मेळ्यांतून परत येताना पूर्वीसारखा छकडी मुलांसाठी खाऊ, खेळणी आणेनासा झाला आहे. कारण, असे काही आणलेले नेत्रमणीला कळले तर तीन दिवस ती अबोला धरील. तथापि मुले जेव्हा तो आल्यावर त्याच्या भोवती गोळा होतात आणि विचारतात की काका, काय आणलं आमच्यासाठी! तेव्हा का कोण जाणे, त्याचे मन क्षणभर वितळते, बेचैन होते; म्हातारी होती त्या वेळच्या आठवणी मनात गर्दी करतात आणि त्याच्या मनाला क्लेश होतात. गेले, ते दिवस गेले! अशी चुटपुट त्याच्या मनाला लागते. मुलांसाठी काही आणले नाही, रिकामा हात हालवीत तो जत्रेतून परतला, तर त्याचे मन त्याला खाऊ लागते. त्याला वाटते, काही नाही तर मुलांना नुसतेच उचलून कडेवर घ्यावे; त्यांची समजूत घालावी; प्रेमाने हात फिरवावा! पण - ! बापरे ! नेत्रमणीची नजर इकडेच रोखलेली आहे - आता धडगत नाही, ती काही जिवंत ठेवायची नाही असे काही केले तर! | </p> |
| <p> | बरजूला दोन मुली - एक हारा आणि दुसरी सोना. शेतकऱ्याच्या मुली, लग्नाचे वय झालेले. किती दिवस बापाच्या घरी राहणार? | </p> |
| <p> | “तसं नाही काका, दादानं मला हिशेब ठेवायला नि खरेदी करायला सांगितलं होतं पण मीच म्हणालो की ते माझ्यानं जमायचं नाही. दुसऱ्या कुणाला सांगा म्हणून तेव्हा दादानं आपल्या मेहुण्याजवळ दिले रुपये.” | </p> |

| | | |
|---|---|---|
| <p> | लगेच टाळी देत मिश्राजी म्हणाले, “दिले ना? देणारच! आता राहिल काय? आता आला किनई मानापमानाचा प्रश्न! भाऊ झाला परका आणि मेहुणा झाला आपला!” | </p> |
| <p> | छकडीचे मत तसे मुळीच खंबीर नव्हते. मिश्रजींच्या बोलण्याने शेवटी ते चळले. घरात आणि घराबाहेर आपल्याला काही स्थान नाही असे त्याला वाटले. तो म्हणाला, “काका, एका घरात राहिलं म्हणजे असंच होतं; वेगळं झालं म्हणजे सर्व सुरळीत होतं; प्रत्येकाला आपलं कर्तव्य करता येतं.” | </p> |
| <p> | “पण वेगळं का व्हायचं? तुझं नडतं कुठं? पोरासोराला शोभेल असं बोलणं.” | </p> |
| <p> | “नाही नाही, पोरासोरांसारखं बोलत नही काका, यापुढं आमचा एकत्र निभाव लागणं कठीण आहे. वरवर दिसायला तर आम्ही एक दिसतो. पण आतून मनाला तडा गेला आहे. करपली भाजी, ना चव ना स्वाद.” | </p> |
| <p> | “वेड्यासारखं बोलतो आहेस झालं, अजून दोघंही पोरसवदा आहात. आत्तापासून वेगळे होणार? आणि तू तर अगदीच बच्चा आहेस. चांगलं खावं प्यावसं तुला वाटलं तर नवल नाही. चार जणात उठावं, बसावं, चार गोष्टी एकाव्या असं वाटणं साहजिक आहे तुला. बोल, तू नुसता हो म्हण. उद्याच तुला पंचायतीमध्ये घेतो.” | </p> |
| <p> | “नाही काका, वेगळं निघाल्याशिवाय गत्यंतर नाही. आधी वेगळाचार, मग सगळं.” | </p> |
| <p> | “तुझं आपलं तेच पुनः पुनः! अरे म्हणतं कोण एकत्र रहा म्हणून? आवडतं कोण तुला? पण तू लहान आहेस. वेगळं राहून प्रपंच तरी चालवता येईल का?” | </p> |
| <p> | छकडी हसून म्हणाला, “का, बरं? काका, तुमच्या दारी आलो तर चतकोर घालाल की नाही पोटाला?” | </p> |
| <p> | “भले! अरे हे काय बोलणं झालं? आणि तू का म्हणून दुसऱ्याच्या घरी जाशील? तुला काय कमी आहे? नालायकीमुळे सर्वनाश होतो; नाहीतर शाम पधानाचा मुलगा असून तू असं बोलला असतास? राम राम, तू आणि माझ्या दारी येशील? असल्या गोष्टी? तू मला मुलासारखाच आहेस. म्हणशील तर उद्याच तीनशे रुपये देतो. दुकान थाट. चांगला व्यापार कर. नफा तुझा तू घे नि माझं मुद्दल मला परत कर. अरे, शेरभर तूप देवाच्या व्रतालाच लागलं म्हणेन. माझं धन शाम पधानाच्या मुलाच्याच कामी येईल ना? कुणा परक्याच्या तर नाही? शाम पधान माणूस पण माणूस होता. दहापाचात त्याची गणना होई. दहा लोक त्याचा शब्द मानीत. त्याचा तू मुलगा आणि असा दारोदार भटकणार? आणि हे सर्व मी आपल्या डोळ्यांदेखत घडू देईन? छेः! अशक्य!” | </p> |
| <p> | हाराच्या आईच्या तोंडून शब्द फुटला नाही. ती नुसती टकामका पाहतच राहिली. बरजूने विचारले “काय ग! घरात ही भांडाण अशीच चालणार का?” | </p> |
| <p> | “मग कशी मिटतील? तुम्हीच सांगा. भांडण उकरून कोण काढतं? ती का मी?” बरजू भाऊ-भावजयीचा प्रश्न घेतो आणि सर्व दोषांचे खापर आपल्या माथी देतो हे तिच्या मनात सलत होते. | </p> |
| <p> | “भांडण काढतं कोण हे शोधलं तरी ते बंद थोडेच होणार?” | </p> |
| <p> | “बंद होवो किंवा राहो. मला मात्र या घरात राहणं अशक्य आहे.” | </p> |
| <p> | “आता वेगळं निघण्याशिवाय दुसरा उपायच नाही म्हणायचा?” | </p> |

| | | |
|---|---|---|
| <p> | “वेगळं निघा की एकत्र रहा, तिच्या धमक्या अन तिचे शिव्याशाप मला यापुढे नाही सहन होणार आणि तिच्यासारखं राहूही शकणार नाही मी.” | </p> |
| <p> | बरजू उमगला की या मानिनीच्या - हाराच्या आईच्या उरावर पहाडासारखे ओझे आहे आणि ते दूर करणे सोपे नाही. वेगळे होण्याचे तिने पक्के ठरविलेल दिसत आहे. उघडपणे ती बोलून दाखवीत नाही येवढेच. बरजूसमोर बोलण्याचे धाडस ती करू शकत नाही. | </p> |
| <p> | बरजू चिडून म्हणाला, “मला हे असं आड बोलणं नको आहे. स्पष्ट स्पष्ट काय ते...” बरजूचे ओठ थरथरू लागले, त्याचे डोळे तरारले. | </p> |
| <p> | हे रौद्ररूप पाहून हाराच्या आईचे धाबे दणाणले. तिच्या नशिबी अशाच माणसाशी गाठ लिहिली होती! हा आता काय करील या आशंकेने तिच्या जिवाचे पाणी झाले. | </p> |
| <p> | हाराची आई भ्याली आणि रडकुंडी होऊन म्हणाली - “नाही त्या गोष्टीसाठी हे येवढं कशाला? मी घरातलं सर्व कामधाम करावं, आला गेला सांभाळावा...” | </p> |
| <p> | बरजू संतापाने म्हणाला, “वर पुनः हे खोटं बोलतेस? घरातलं सारं काम तू करतेस? छोटी काहीच करीत नाही?” | </p> |
| <p> | रडून ओरडून बरजूच्या मनाचा दगड विरघळत नाही हे ती जाणून होती. त्यावर पुनः या खोट्या बोलण्याने तो आणखी संतापला आहे. मागे या खोटे बोलण्याबद्दल तो अन्नाला देखील शिवला नव्हता. पण याला खोटे बोलणे म्हणायचे का? लोक तर याहून किती पटीने खोटे बोलतात. | </p> |
| <p> | स्वर खाली करून ती म्हणाली - “मी भांडले, धाकदपटशा केला असं मानलं घडीभर, पण मी म्हणते माझ्या मुलांनी तर नाहीना काही केलं? त्यांना का बोलावं तिनं वेडंवाकडं?” | </p> |
| <p> | छोट्या पधानपाड्यात रोजच्या सारखी सायंकाळ झाली. गुरेवासरे घराकडे वळली. पाखरे घरट्यात परतली. शेतात कुणीतरी हाक दिली - “अरे नवीना इकडे ये.” शेतकऱ्याच्या सुनेने वृंदावनी तेलवात लाविली. घरांच्या छपरांवर रेंगाळणारा धूर आकाशात उंच पसरला. | </p> |
| <p> | आपल्या घराच्या दारासमोरच छकडीने एक दुकान थाटले आहे. ग्राहक येतात. लगबगीने जिनसा घेतात आणि परततात. | </p> |
| <p> | “पधान, माझे धान मोजून घ्या बरं.” | </p> |
| <p> | “छकडी काका, हे इकडे आहेत बरं का माझे धान.” | </p> |
| <p> | “मला जरा ढबूची तंबाखू...” | </p> |
| <p> | “छकडी, जरा आगपेटी तर दे.” | </p> |
| <p> | “मला जरा घाई आहे. लवकर द्या ना जिन्नस. मूल रडत आहे माझं.” | </p> |
| <p> | “तुझं मूल रडतं की मरतं त्याला मी काय करू?” या कावकावीने छकडी त्रासून जात असे. | </p> |
| <p> | “वस्तू घ्यायला आले पण मिळेल तेव्हा ना? द्या, माझे धान तरी परत करा.” | </p> |
| <p> | “घे, घेऊन जा, टळ.” | </p> |
| <p> | “येवढं रागवायचं कशापायी? सौदा तो काय येवढासा, देऊन टाका झालं.” | </p> |
| <p> | “ही तंबाखू किडकी आहे.” | </p> |
| <p> | “छिकडी, जरा चार विड्याही देऊन टाक. बैलांचं चारापाणी अजून व्हायचं आहे.” | </p> |
| <p> | “हात तर दोनच आहेत ना मला? अन् या हुज्जती पायी घसा फुटायची वेळ आली आहे. | </p> |

| | | |
|---|---|---|
| | काय ग सनियाची आई? तुला काय हवं?” | |
| <p> | “मी तर कधीपासून तंबाखूसाठी ताटकळले आहे.” | </p> |
| <p> | छकडी धानाची टोपली तशीच टाकून उभा राहिला - “जरा तूच करून पहा ना हे.” | </p> |
| <p> | ही संधी चांगली आहे हे मिश्रजीनी ताडले आणि म्हणाले, “बायकोबद्दल तू म्हणालास ना? अगदी खरं आहे ते! अरे स्त्री म्हणजे घरची लक्ष्मी, देवता! घरात काय चालतं ते आपल्याला काय कळणार? आणि कळलं एकपरी तरी मी म्हणतो आपल्याला समजणार काय त्यात? आपण बाहेर राहणार, घर तर बायकोच सांभाळणार ना? धरमूदासाचं काय मनावर घेतोस? बाईलबुद्धी आहे लेकाचा. काय होणार त्याच्या बोलण्यानं? आता माझंच पहाना! वासूची आई प्रथमपासून मला म्हणायची की वेगळे व्हा, वेगळे राहू आपण! पण म्हटलं किती झालं तरी बाई माणूस; कशाला लक्ष द्या. पण वेगळा झालो आणि पाहातोस तू; संसार चाललाच आहे ना आमचा देवाच्या दयेनं? मोठ्या भावासारखं, आमच्या त्या केलासारखं - दुसऱ्याच्या घरी स्वयंपाकपाणी करून भीक मागून दारोदारी तर फिरत नाही ना?” | </p> |
| <p> | केला हा मिश्रजींचा धाकटा भाऊ आणि मिश्रजी मधले भाऊ आहेत. | </p> |
| <p> | “हे काय काका, आम्ही असताना तुम्ही भीक मागाल तर मग झालंच म्हणायचं!” | </p> |
| <p> | “हयःऽ हयःऽ, अरे तू बच्चा आहेस छकडी! तू कशाला भीक मागशील? दहा एकर जमीन आहे तुझ्याजवळ नांगर-बैलजोडी, सात पिढ्यांपासूनचं हे घर - सगळं तर आहे. तुला कळत नाही म्हणतो मी ते याचसाठी. नादान आहेस तू!” | </p> |
| <p> | “तुम्हाला ठाऊक आहे ना काका, शेतीवाडीसंबंधी एक अक्षर मला सांगेल बरजू तर शपथ!” | </p> |
| <p> | खिन्न होऊन मिश्रजी म्हणाले - “का सांगेल ते? तू काय दूधखुळा बच्चा आहेस तर त्यानं तुला सांगत बसावं?” | </p> |
| <p> | “बस्स, ठरलं काका! चंदरा सिअल म्हणत होता तसंच आता मी करणार. माझी दोनशे रुपये आमदानीची शेती वेगळीच ठेवणार मी. पुसाच्या महिन्यात धान कापून खळंही वेगळंच करीन चंदरा म्हणाला मला की ‘अरे तुला हे सांगांव कोणी? जमीन तुझी, काम तुझं! नोकर राबतो तुझ्या शेतीवर, तो तुझ्याच पैशावर ना? म्हणे, भाऊ पाहतो, राबतो. एखाद दुसरं काम केलं, येवढासा नांगर सरकावला तर ते काय काम झालं? भागीदारीमध्येसुद्धा तीनचार एकराचं पीक ठेवतात वेगळं. शेत वाहतो तो एकटाचे खातो असं थोडंच आहे. शेतीवाल्यालाही देतो ना?’ चंदरा जातीचा सिअल झाला म्हणून काय त्याला अक्कल नाही? घरवालीला विचारलं तर म्हणाली - ‘यात विचारायचं काय? आपल्या त्या खळ्याजवळच जमीन साफ करून दुसरं खळं करा तयार. आपले मूग तिथंच चुरू म्हणजे झाले.” | </p> |
| <p> | “बरं तर, तू एक गोष्ट कर. नेत्रमणीला भांडायला तू स्वतःहून उत्तेजन देऊ नकोस. ती भांडली, मुलांना बेडंविद्रं बोलली तरी तू उलट बोलू नकोस. तू इतकी व्रतं करतेस, उपासतापास करतेस; असं समज की, हे मौनाचं व्रतच तू घेतलं आहेस. जमेल तुला?” | </p> |
| <p> | “का नाही जमायचं?” | </p> |
| <p> | परंतु हाराच्या आईने अगदी मनापासून कबूल केले असं बरजूला वाटले नाही. आणि खरेच, दोन दिवसांनी तिचे नेत्रमणीशी भांडण झाले. भांडण सुरू झाल्यानंतर मात्र तिची चूक तिला कळून आली. लाजेने ती चूर होऊन गेली. बरजूने सांगितले ते रागाच्या भरात ती विसरून | </p> |

| | | |
|---|---|---|
| | गेली. | |
| <p> | “व्रताचं पालन तर छानच चाललं आहे!” | </p> |
| <p> | “जळलं मेलं माझं लक्षण!” | </p> |
| <p> | “हरकत नाही. आता पुनः मात्र विसरू नकोस. विसरलीस अन् भांडायला लागलीस तर यापुढे मला वाटेल ते करायला मी मोकळा आहे.” | </p> |
| <p> | हाराच्या आईचा जीव उडाला. पुनः मागल्यासारखे झाले तर? तथापि नेत्रमणीने पदोपदी तिच्यासमोर तिच्या मुलांना वेडेवाकडे बोलावे आणि तिने तोंड दाबून हे सहन करावे, ब्र देखील काढू नये. कसे जमेल ते? | </p> |
| <p> | बरजू पुनः विचार करू लागला. घर सोडून परागंदा झाल्यानेही सुधारणार नाही, घरी राहूनच काहीतरी करायला हवं. यावेळी जर तिने नियम मोडला तर बरजू घरात बोलणेच बंद करील! | </p> |
| <p> | एक आठवडा असाच लोटला. नेत्रमणी घालून पाडून बोलायची पण तिला प्रत्युत्तर मिळाले नाही. अंगाची लाही लाही व्हायची तिच्या. कारण बोलू नये ते नेत्रमणी बोलत असे - ‘आग लागो, निसंतान होवो, तळपट उडो’, काय वाटेल ते! पण हाराची आई उलटून बोलायची नाही. बरजू घरात नसला तर एखाद दुसरा शब्द बोलण्याची अनावर इच्छा तिला होई पण लगेच भीती वाटे तिला की, कुठे आपण बोलायला जाऊ आणि निमित्ताला टेकलेल्या नेत्रमणीचा आरडाओरडा बरजूच्या कानी पडेल! त्यापेक्षा न बोललेलेच बरे! त्यामुळे बरजू घरात किंवा अवतीभवती कुठे असला तर ती सगळे सहन करीत असे. | </p> |
| <p> | त्या दिवशी, कसा तो कुणास ठाऊक, बरजू नांगर घेऊन लवकरच घरी परतला. अंगणात बैलांची धूर काढतानाच त्याला घरातून आवाज ऐकू आला. नेत्रमणी रागाने लाल होऊन आग ओकत होती; विस्तवात मधून मधून पाचोळा घालावा त्याप्रमाणे हाराची आई एखाददुसरा जळता शब्द बोलत होती. बरजू आल्याचे पाहताच तिची बोबडी वळली. नेत्रमणीला लाजसंकोच नव्हताच. हाराची आई जीभ दाती दाबून दृष्टीआड झाली. नेत्रमणीचा स्वर बरजूला पाहून जरा खालच्या पट्टीवर आला पण बोलणे चालूच राहिले तिचे! | </p> |

</body></text>
</Doc>